## प्रेस नोट

**-: फौजदार चावडी पोलीस ठाणे,सोलापूर शहर D. B. पथकाची कामगिरी :-**

**एस.टी.स्टॅंड येथे गर्दीचा फायदा घेवुन महिलाचे दागिणे चोरणाऱ्या सराईत महिला आरोपीकडुन ५.५ तोळे सोन्याचे दागिण्यासह ५०००/-रू रोख रक्कम असे एकुण १,७७,०००/- रू मुद्देमाल हस्तगत केले आहे.**

फिर्यादी नामे- शोभा दत्तु सुरवसे, वय-५५ वर्षे, व्यवसाय-गृहिणी, रा.कल्याणी बिल्डींगचे मागे, विक्रम नगर, लातुर हे दि.२१/०१/२०२४ रोजी सायंकाळी ०४.३० चे सुमारास सोलापूर एस.टी.स्टॅंड येथे एस.टी. मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांची पर्सची चैन उघडुन सोन्याचे दागिणे व रोख रक्कम अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे समंती वाचुन, मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे. म्हणुन दि.२२/०१/२०२४ रोजी दिलेले तक्रारीवरुन फौजदार चावडी पोलीस ठाणे गु.र.क्र.३६/२०२४ रोजी भादविसं कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयामधील अज्ञात चोरटयाचा शोध घेत असताना पोलीसांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एक काळ्या रंगाचा बुरखा घातलेली महिला वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असलेली पाच-साडेपाच फुट उंच असलेली तिच्या खाद्याला एक क्रिम रंगाची पर्स अडकवलेली मजबुत बांध्याची महिला पंचकट्टा येथुन विजापूर वेस मार्गे सराफ कट्टा येथे चोरीचे दागिणे विक्री करण्यासाठी जाणार आहे. असे खात्रीशीर बातमी मिळाली. त्याअनुषंगाने सदर बातमीची योग्य ती शहानिशा करुन बातमीदाराने सांगीतलेले प्रमाणे सदर ठिकाणी जावुन खात्री करत असताना बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाशी मिळत्या जुळत्या वर्णाची एक महिला मार्कंडेय मंदिरा कडुन विजापूर वेसकडे पायी चालत येत असतना दिसले.ती आम्हास पाहुन पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असातना तीस दि.२४/०१/२०२४ रोजी १२.१५ वा. शिताफिने ताब्यात घेतले. तिस तिचे नांव पत्ता विचारले असता तिने आपले नाव **फरजाणा अब्बास शेख, वय-४१ वर्षे, रा.४८४/४, गोदुताई विडी घरकुल, दोन नंबर टाकी, क्रांती चौक,कुंभारी रोड, सोलापूर** असे सांगीतले, तिस तिच्या खाद्याला अडकवलेल्या पर्स मध्ये काय आहे या बाबत विचारणा केली असता ती प्रथम उडवा-उडवीचे उत्तरे देवु लागली त्यामुळे तिचे पर्स महिला पंचा समक्ष तपासली त्यामध्ये रोख रक्कम व विविध सोन्याचे दागिणे मिळुन आले. त्या बाबत तिच्याकडे चौकशी केली असता तिने सांगितले की, सदर रोख रक्कम व सोन्याचे दागिणे हे तिने दि.२०/०१/२०२४ रोजी सोलापूर एस.टी.स्टॅंड येथे एस.टी.बस मध्ये चढताना प्रवाशाच्या गर्दीचा फायदा घेवुन एका महिलेच्या पर्स मधुन चोरी केले असल्याचे सांगिते. सदर सोन्याचे दागिणे फौजदार चावडी पोलीस ठाणेकडील गुरनं-३६/२०२४ भादवि कलम ३७९ मध्ये जप्त केले आहेत. तिच्या ताब्यातुन रोख ५०००/-रू व ५.५ तोळे सोन्याचे दागिणे जप्त केले आहेत.

## सदरची कामगिरी

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त श्री.राजेंद्र माने सो, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ) श्री.विजय कबाडे मा. सहा.पोलीस आयुक्त विभाग -१, अशोक तोरडमल, वपोनि विश्वनाथ सिद, दुपोनि विकास देशमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे, पोह/अजय पाडवी, पोह/प्रविण चुंगे, पोना/आयाज बागलकोटे, पोकॉ/कृष्णा बडुरे, पोकॉ/ विनोद व्हटकर, पोकॉ/सचिनकुमार लवटे, पोकॉ/नितीन मोरे, पोकॉ/अजय चव्हाण, पोकॉ/अमोल खरटमल, पोकॉ/पंकज घाडगे, पोकॉ/सुधाकर माने, पोकॉ/विनोदकुमार पुजारी, पोकॉ/अर्जुन गायकवाड, पोकॉ/शशिकात दराडे, पोकॉ/तोसीफ शेख, पोकॉ/करण माने, पोकॉ/नागनाथ गुळवे यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**फौजदार चावडी पोलीस ठाणे**
**सोलापूर शहर**

Scanned by CamScanner


8668510527
विश्वनाथ सिद